दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. १४ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

गुरुवार दि. १४ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, द्वादशी सकाळी ११-२१ पर्यंत नंतर त्रयोदशी तिथी, दिवस नक्षत्र–रेवती रात्री १०-३४ पर्यंत नंतर अश्विनी, चंद्र रास - मीन रात्री १०-३४ पर्यंत नंतर मेष, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### बारामतीत विमान कोसळले

**पुणे**: बारामतीत पुन्हा एकदा शिकाऊ विमानाचा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. बारामती तालुक्यातील गोजुबावी गावाच्या हद्दीत रेडबर्ड कंपनीचे एक शिकाऊ विमान कोसळल्याची माहिती समोर आली असून, सुदैवाने या अपघातात वैमानिक सुरक्षित असल्याचे प्राथमिक वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोजुबावी परिसरात प्रशिक्षण उड्डाण सुरू असताना अचानक शिकाऊ विमान कोसळले. अपघात नेमका कशामुळे झाला, याचे कारण स्पष्ट झालेले नाही.

### नाशिक, जयपूर, गुरुग्रामसह अनेक शहरांमध्ये कारवाई; कोचिंग नेटवर्क तपासाच्या रडारवर

# ‘नीट’ पेपरफुटीप्रकरणी पाच जण अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या ‘नीट-यूजी २०२६’ परीक्षेच्या कथित पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने देशभरात मोठी कारवाई करत अनेक राज्यांमध्ये एकाचवेळी छापे टाकले असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे. राजस्थानमधील जयपूर येथून तिघांना, गुरुग्राममधून एकाला आणि महाराष्ट्रातील नाशिकमधून एका संशयिताला ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.




या प्रकरणाच्या तपासात पेपरफुटीचे जाळे अनेक राज्यांपर्यंत पसरल्याचे स्पष्ट होत असून, राजस्थान, महाराष्ट्र, हरियाणा आणि उत्तराखंडमध्ये तपास यंत्रणांनी हालचाली वाढवल्या आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या तक्रारीनंतर सीबीआयने अधिकृत एफआयआर दाखल करत विशेष तपास पथके स्थापन केली आहेत.

तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, परीक्षेपूर्वी सोशल मीडियावर सुमारे ४०० प्रश्नांचा एक तथाकथित “गेस पेपर” व्हायरल झाला होता. त्यातील तब्बल १०० हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. काही अहवालांनुसार, सुमारे ७० टक्के प्रश्न अंतिम प्रश्नपत्रिकेशी मिळतेजुळते होते.

महाराष्ट्रातील नाशिक आणि लातूर हे या तपासातील महत्त्वाचे केंद्र बनले आहेत. नाशिक पोलिसांनी ताब्यात घेतलेला संशयित हा मध्य प्रदेशातील सिहोर येथील बीएएमएसचा विद्यार्थी असून तो नाशिकमध्ये करिअर काउन्सेलर म्हणून कार्यरत होता. पोलिसांपासून बचाव करण्यासाठी त्याने आपला वेश आणि हेअरस्टाईल बदलल्याचेही तपासात समोर आले आहे.

दरम्यान, पुण्यातील एका महिलेचीही अटक करण्यात आली असून तिने विद्यार्थ्यांना फुटलेल्या प्रश्नपत्रिका मिळवून देण्यासाठी मदत केल्याचा आरोप आहे. तपास यंत्रणांच्या मते, महाराष्ट्रातील काही खासगी कोचिंग क्लासेसच्या टेस्ट सिरीजमधील १२० प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत आल्याने त्या संस्थांचीही चौकशी सुरू करण्यात आली आहे. लातूरमधील काही कोचिंग सेंटरच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे.

राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलाने प्राथमिक तपासात “पेपर लीक माफिया” सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला आहे. काही ठिकाणी प्रश्नपत्रिका “गेस पेपर”च्या नावाखाली १० ते २५ लाख रुपयांपर्यंत विकल्या गेल्याची माहिती समोर आली आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. ‘नीट-यूजी २०२६’ परीक्षा अखेर रद्द करण्यात आली असून नव्याने परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे.

## विरोधी पक्षनेता ‘रबर स्टॅम्प’ नाही : राहुल गांधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय अन्वेषण विभागाच्या नव्या संचालकांच्या निवडीवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत राहुल गांधी यांनी निवड प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त करत आपण या प्रक्रियेशी असहमत असल्याचे स्पष्ट केले.

पंतप्रधानांच्या ७, लोक कल्याण मार्ग येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीला सरन्यायाधीश सूर्यकांत आणि राहुल गांधी उपस्थित होते. या बैठकीनंतर राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर पत्र प्रसिद्ध करत आपली भूमिका स्पष्ट केली. राहुल गांधी यांनी आरोप केला की, सीबीआय संचालक निवड प्रक्रिया ही केवळ औपचारिकता बनवण्यात आली आहे. निवडीसाठी शॉर्टलिस्ट करण्यात आलेल्या ६९ उमेदवारांची सविस्तर माहिती समितीसमोर ठेवण्यात आली नाही. “विरोधी पक्षनेत्याला केवळ रबर स्टॅम्प बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा पक्षपाती प्रक्रियेत सहभागी होऊन मी माझे घटनात्मक कर्तव्य टाळू शकत नाही,” असे राहुल गांधी यांनी म्हटले.

सध्याचे सीबीआय संचालक प्रवीण सूद यांचा कार्यकाळ २४ मे रोजी संपणार आहे. त्याआधी नव्या संचालकांच्या नियुक्तीसाठी ही बैठक घेण्यात आली होती. नव्या सीबीआय संचालकपदासाठी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यावेळी दाखवलेल्या धाडसामुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली होती.

## सारांश वृत्त

### केरळच्या मुख्यमंत्रिपदाची काँग्रेसकडून आज घोषणा

**नवी दिल्ली** : काँग्रेस गुरुवारी केरळमध्ये मुख्यमंत्रिपदाची घोषणा करणार आहे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यात सुमारे ४० मिनिटे झालेल्या बैठकीनंतर पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी सांगितले की, केरळच्या पुढील मुख्यमंत्रिपदाचा निर्णय उद्या जाहीर केला जाईल. केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसप्रणित यूडीएफने दोन तृतीयांश बहुमत मिळवले होते.

### दिल्लीतील मंत्र्यांचा मेट्रो प्रवास सुरू

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन संवर्धनाच्या आवाहनानंतर दिल्लीच्या मंत्र्यांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्यास सुरुवात केली आहे आणि सरकारी वाहनांचा वापर मर्यादित केला आहे, मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी नागरिकांना मेट्रो प्रवास आणि कारपूलिंगचा त्यांच्या दैनंदिन दिनक्रमात समावेश करण्याचे आवाहन केले आहे. पर्यटनमंत्री कपिल मिश्रा यांनी बुधवारी मेट्रोने प्रवास केला आणि सांगितले की जेव्हा आवश्यक असेल तेव्हा ते सार्वजनिक वाहतूक किंवा केवळ एका अधिकृत वाहनाचा वापर करतील.

### अण्णाद्रमुकच्या विधिमंडळ पक्षात फूट

**चेन्नई** : अण्णाद्रमुकच्या अध्यक्षतेखालील एका गटाने बुधवारी विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावर सरकारच्या विरोधात मतदान केले, तर दुसऱ्या गटाने पक्षाच्या हुकुमाचे उल्लंघन करून टीव्हीकेला मतदान केले. अण्णाद्रमुकच्या २५ आमदारांनी विजय यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या बाजूने मतदान केले, तेव्हा पलानीस्वामी यांनी बंडखोरांवर कारवाई केली.

## इंधन बचतीसाठी राज्य सरकारचे मोठे निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : इंधन बचत आणि परकीय चलन साठ्याचे संरक्षण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानंतर महाराष्ट्र सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज घेतलेल्या दोन उच्चस्तरीय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेत काही महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले. या बैठकींना मुख्य सचिव, पोलिस महासंचालक तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्य सरकारने सर्वप्रथम मंत्र्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्याचा निर्णय घेतला आहे. बाहेरील दौऱ्यांदरम्यान निर्धारित संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात नसतील, याची जबाबदारी संबंधित पोलिस आयुक्त किंवा जिल्हा पोलिस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे.

याशिवाय मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विदेश दौरे मर्यादित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. अत्यावश्यक परिस्थिती वगळता विदेश दौरे टाळावेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर शासकीय विमान आणि हेलिकॉप्टरचा वापरही केवळ अपरिहार्य प्रसंगीच करण्यास सांगण्यात आले असून, नियमित विमानसेवेला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### नवी मुंबईतील सिडको कार्यालयात २२ हजारांची लाच घेताना जाळ्यात

# सिडकोचा अप्पर जिल्हाधिकारी रंगेहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी मुंबई** : राज्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) कारवायांचा धडाका सुरू असतानाच नवी मुंबईतील सिडको कार्यालयात मोठी कारवाई करण्यात आली आहे. सिडकोमधील भूमी व भूमापन विभागाचे अप्पर जिल्हाधिकारी रामदास जगताप यांना २२ हजार रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहात अटक केली. या कारवाईमुळे सिडकोसह प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.




लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित कामासाठी तक्रारदाराकडून २२ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर सापळा रचण्यात आला. त्यानुसार नवी मुंबईतील सिडको कार्यालयातच रामदास जगताप यांना लाच स्वीकारताना पकडण्यात आले.

अप्पर जिल्हाधिकाऱ्याच्या स्तरावरील अधिकाऱ्यावर झालेल्या या कारवाईमुळे प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. गेल्या काही महिन्यांत एसीबीने राज्यभरात महसूल, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध शासकीय विभागांतील अधिकाऱ्यांवर सातत्याने कारवाया केल्या आहेत. शिपायापासून ते तहसीलदार आणि अप्पर जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत अनेक अधिकारी लाच घेताना पकडले गेले आहेत.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी पुण्यातही अशीच धक्कादायक कारवाई समोर आली होती. पुणे पोलीस आयुक्तालय परिसरात आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली तोटेवार यांना तब्बल २८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना एसीबीने अटक केली होती. थेट पोलीस आयुक्तालय परिसरात झालेल्या त्या कारवाईमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली होती.

राज्यात एसीबीच्या सातत्यपूर्ण कारवायांमुळे भ्रष्टाचाराविरोधात कठोर संदेश देण्याचा प्रयत्न होत असला तरी दुसरीकडे लाचखोरीच्या घटना कायम असल्याचे या प्रकरणांवरून स्पष्ट होत आहे. प्रशासनातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना करण्याची मागणी आता पुन्हा जोर धरू लागली आहे.

### मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला दोन वर्षे पूर्ण होणार

# केंद्रात जूनमध्ये मंत्रीमंडळ विस्ताराची शक्यता?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भाजप संघटना आणि केंद्र सरकारमध्ये मोठ्या बदलांच्या चर्चांना पुन्हा वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला ९ जून रोजी दोन वर्षे पूर्ण होत असून, त्याआधी मंत्रिमंडळ विस्तार आणि संघटनात्मक फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचवेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन आपल्या नव्या संघटनेची घोषणा करतात का, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

मागील दोन कार्यकाळांचा विचार करता, सरकार स्थापन झाल्यानंतर काही महिन्यांतच मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटपातील बदल करण्यात आले होते. २०१४ मध्ये मोदी सरकार स्थापन झाल्यानंतर नोव्हेंबरमध्ये पहिला विस्तार झाला होता. त्यानंतर जुलै २०१६ आणि सप्टेंबर २०१७ मध्ये मोठे फेरबदल करण्यात आले होते. दुसऱ्या कार्यकाळात जुलै २०२१ मध्ये मोठा मंत्रिमंडळ विस्तार झाला, तर मे २०२३ मध्ये काही खात्यांमध्ये बदल करण्यात आले होते.

याच पार्श्वभूमीवर आता तिसऱ्या कार्यकाळाच्या दोन वर्षांच्या टप्प्यावर पुन्हा एकदा मंत्रिमंडळ फेरबदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सध्या केंद्रीय मंत्रिमंडळात ७२ सदस्य आहेत, तर घटनात्मकदृष्ट्या मंत्रिमंडळाची कमाल मर्यादा ८१ सदस्यांची आहे. त्यामुळे काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळू शकते, तर काही विद्यमान मंत्र्यांच्या जबाबदाऱ्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, २०२७ मध्ये होणाऱ्या विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचा विचार करून सामाजिक आणि प्रादेशिक संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. निवडणूक असलेल्या राज्यांमधील काही प्रभावी नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान देऊन राजकीय संदेश देण्याची रणनीती भाजप आखत असल्याची चर्चा आहे.

भाजपच्या संघटनात्मक पातळीवरही मोठ्या बदलांची तयारी सुरू असल्याचे सांगितले जात आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर नितीन नवीन यांनी संघटनेत व्यापक फेरबदल करण्यासाठी चर्चा आणि सल्लामसलत सुरू केली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नव्या संघटनात्मक रचनेत युवा नेतृत्वाला अधिक संधी मिळू शकते.

### नागपूर विमानतळ अत्याधुनिक होणार

**नवी दिल्ली** : नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ यांच्या आधुनिकीकरण आणि अद्ययावतीकरणाला मोठी मंजुरी देण्यात आली आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर हा प्रकल्प राबवण्यात येणार असून, यामुळे नागपूर विमानतळाच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे. केंद्र सरकारच्या निर्णयानुसार, भारतीय विमानतळ प्राधिकरण यांनी मिहान इंडिया लिमिटेडला दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्ट्याची मुदत ६ ऑगस्ट २०३९ नंतरही वाढवण्यात आली आहे.

# अमूलच्या दुधाचे दर वाढले

### आजपासून प्रतिलिटर २ रुपयांची वाढ; घरगुती बजेटवर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशातील दुग्ध क्षेत्रातील आघाडीची संस्था गुजरात को-ऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन (जीसीएमएमएफ) ने ग्राहकांना मोठा झटका देत ‘अमूल’ ब्रँडच्या दुधाच्या किमतीत प्रतिलिटर २ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. ही दरवाढ गुरुवार, १४ मे २०२६ पासून देशभरात लागू होणार असून, त्यामुळे सर्वसामान्यांच्या मासिक घरखर्चावर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता आहे.

फेडरेशनने जारी केलेल्या अधिकृत पत्रकानुसार, अमूल ताजा, अमूल गोल्ड, अमूल शक्ती यांसह ताज्या दुधाच्या सर्व प्रमुख प्रकारांच्या दरात वाढ करण्यात आली आहे. देशभरातील सर्व बाजारपेठांमध्ये ही नवीन दररचना लागू होणार आहे.

जीसीएमएमएफने स्पष्ट केले की, एकूण दरवाढ ही सुमारे २.५ ते ३.५ टक्क्यांच्या मर्यादेत असून, ती सध्याच्या अन्नधान्य महागाई दरापेक्षा कमी असल्याचा दावा करण्यात आला आहे. यापूर्वी १ मे २०२५ रोजी अमूलने दुधाच्या दरात वाढ केली होती. त्यानंतर वर्षभराने पुन्हा दरवाढ करण्यात आल्याने ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः आधीच वाढत्या महागाईचा सामना करणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबांना याचा फटका बसणार आहे.

दुधाच्या किमती वाढवण्यामागे उत्पादन खर्चात झालेली वाढ हे प्रमुख कारण असल्याचे फेडरेशनने म्हटले आहे. गेल्या काही महिन्यांत जनावरांच्या खाद्याचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. तसेच दूध पॅकिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक फिल्मच्या किमतीतही वाढ झाली आहे. याशिवाय इंधन दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढल्याने संपूर्ण पुरवठा साखळीवरील आर्थिक भार वाढल्याचे फेडरेशनने स्पष्ट केले.

### आरटीई प्रवेश प्रक्रियेत भ्रष्टाचाराचे आरोप

# खेड तालुक्यात एका प्रवेशासाठी लाखोंची देवाणघेवाण?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : खेड तालुक्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेत मोठ्या भ्रष्टाचाराचे आरोप समोर आल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी इंग्रजी माध्यम शाळांमध्ये मोफत शिक्षण देण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या या योजनेत प्रवेश निश्चित करण्यासाठी ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंतची मागणी करण्यात आल्याची चर्चा रंगली आहे.
खेड पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील अधिकारी आणि काही शिक्षकांनी संगनमत




करून नियमबाह्य पद्धतीने प्रवेश निश्चित केल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेतील विरोधी गटनेते विजयसिंह शिंदे पाटील यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत चौकशीची मागणी केली. त्यानंतर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत.
शासनाच्या धोरणानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी इंग्रजी माध्यम शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मोफत शिक्षण देण्यासाठी आरटीई अंतर्गत प्रवेश दिले जातात. खेड तालुक्यात यंदा विविध शाळांमध्ये सुमारे ८६४ प्रवेश ऑनलाइन लॉटरी पद्धतीने निश्चित करण्यात आले होते. ही प्रक्रिया पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मात्र, अनेक पात्र विद्यार्थ्यांना नियमात बसत नसल्याचे कारण देत जाणीवपूर्वक डावलण्यात आले, तर लॉटरीत मागे असलेल्या विद्यार्थ्यांना संधी देण्यात आल्याचे आरोप पालकांकडून करण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही पालकांनी जिल्हा शिक्षण अधिकारी संजय नाईकडे यांच्याकडेही तक्रारी केल्याची माहिती समोर आली आहे.
या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना आमदार बाबाजी काळे म्हणाले की, “उत्पन्न कमी असलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांना चांगल्या शाळांमध्ये शिक्षण मिळावे, या उद्देशाने शासनाने ही योजना सुरू केली आहे. प्रक्रियेदरम्यान पालकांकडून काही तक्रारी आल्या होत्या. अधिकाऱ्यांना योग्य सूचना देण्यात आल्या आहेत. चौकशीत काही चुकीचे आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल.”
माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनीही गंभीर आरोप केले आहेत. “आळंदी परिसरातील एका शाळेत लॉटरी लागलेल्या सलग १४ विद्यार्थ्यांचे प्रवेश विविध कारणे दाखवून रद्द करण्यात आले. हे कोणाच्या दबावाखाली झाले, याची माहिती समोर आणणार आहोत,” असे त्यांनी म्हटले.
दरम्यान, जिल्हा परिषद स्तरावर चौकशी सुरू होणार असल्याने आरटीई प्रवेश प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पालकांमध्ये संतापाचे वातावरण असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## २२ आमदारांसह तटकरे-पटेल भाजपमध्ये जाणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : रोहित पवार यांनी केलेल्या एका दाव्यामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल हे २२ आमदारांसह भारतीय जनता पक्षातून निवडणूक लढवणार असल्याचा सनसनाटी दावा रोहित पवार यांनी केला. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत वादाच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांच्या या विधानाने राजकीय चर्चांना आणखी उधाण आले आहे. “त्यांचं सगळं आधीच ठरलेलं आहे. २२ आमदारांचं ठरलं आहे. काही आमदार एकनाथ शिंदे यांच्यासोबतही जाणार आहेत. फक्त भाजपमध्ये प्रवेश कधी करायचा, हे ठरणं बाकी आहे,” असे रोहित पवार म्हणाले.

ते म्हणाले की, “ही प्रक्रिया २०२९ च्या निवडणुकांपूर्वी पूर्ण होणं अपेक्षित होतं. मात्र आता ती जलद गतीने सुरू असल्याचं दिसत आहे. कारण आताच प्रवेश झाला, तर पुन्हा निवडणुकीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.”

राष्ट्रवादी काँग्रेसमधील संघटनात्मक बदलांमुळे आधीच संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदनामांचा उल्लेख नसल्याचे समोर आले होते. त्यानंतर ही कारकुनी चूक असल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले.

## संपादकीय

# पूर्वेचा सूर्य आणि मोफतखोरीचे ग्रहण



**पूर्वेकडील राजकीय परिवर्तनाकडे केवळ सत्तापालट म्हणून पाहणे संकुचित ठरेल. प्रस्थापित मानसिकतेच्या साचलेपणाला मतदारांनी दिलेले हे उत्तर असले तरी आता लोकप्रिय घोषणांच्या मृगजळामागे न धावता प्रशासकीय शिस्त आणि आर्थिक भान राखणे हेच खऱ्या अर्थाने मोठे आव्हान आहे.**

भारतीय लोकशाहीच्या पटलावर जेव्हा एखादा प्रदीर्घ काळ सत्तेत असलेला गड कोसळतो तेव्हा त्या विजयाचा जल्लोष होणे स्वाभाविक असते. भारताच्या पूर्व दिशेला असलेल्या राज्यांमध्ये नुकताच जो राजकीय चमत्कार घडला आहे त्याकडे केवळ एका विशिष्ट विचारधारेचा विजय म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा विजय म्हणजे गेली अनेक दशके एकाच साच्यात अडकलेल्या प्रशासकीय व्यवस्थेविरुद्ध जनतेने पुकारलेले बंड आहे. पूर्वेकडील या राज्यांनी आता एका नव्या युगात प्रवेश केला असला तरी त्यांच्यासमोर उभे असलेले आर्थिक प्रश्न जुनेच आणि अधिक गंभीर आहेत. आज आपल्या देशात मोफतखोरीची एक नवी संस्कृती उदयाला आली आहे जिथे विकासाच्या प्रकल्पांपेक्षा रोख रकमांच्या वाटपाला अधिक महत्त्व दिले जाते. पूर्वेकडील राज्यांमध्ये सत्तेवर आलेल्या नव्या राजवटीने जर याच जुन्या आणि विघातक मार्गाचा अवलंब केला तर तो जनतेचा विश्वासघात ठरेल. सरकारी तिजोरीतील पैसा हा जनतेचा घाम गाळून कमावलेला कर असतो आणि त्याचे वाटप केवळ मतांचे राजकारण डोळ्यासमोर ठेवून करणे ही एक प्रकारची आर्थिक अनैतिकता आहे. शाश्वत विकासाचा रस्ता हा कधीही मोफत वीज किंवा मोफत पाण्याच्या घोषणांमधून जात नाही. प्रगतीसाठी आवश्यक असते ती पायाभूत सुविधांची उभारणी आणि उद्योगांना पोषक असे वातावरण. पूर्वेकडील ही राज्ये नैसर्गिक साधनसंपत्तीने अत्यंत समृद्ध आहेत मात्र तिथे उद्योगांची चाके अद्यापही मंद गतीनेच फिरत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे आजवरच्या राज्यकर्त्यांनी भांडवली गुंतवणुकीपेक्षा लोकानुनय करणाऱ्या योजनांना अधिक प्राधान्य दिले. नव्या सरकारने आता हा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. जर तिजोरीतील पैसा केवळ सवलतींच्या वाटपातच संपून गेला तर रस्ते आणि रेल्वे तसेच सिंचनाचे प्रकल्प उभे करण्यासाठी निधी कुठून येणार हा प्रश्न उभा राहतो. केवळ केंद्राच्या अनुदानावर अवलंबून राहणे हे राज्याच्या स्वावलंबनासाठी भूषणावह नसते. प्रशासकीय पारदर्शकता आणि नोकरशाहीची कार्यक्षमता हा सुशासनाचा कणा असतो. पूर्वेकडील राज्यांमध्ये अनेकदा नोकरशाही हीच सत्ताधाऱ्यांची कवचकुंडले बनून राहते आणि त्यातूनच भ्रष्टाचार फोफावतो. नव्या सरकारला जर खरोखरच बदल घडवायचा असेल तर त्यांना प्रशासकीय यंत्रणेला राजकीय जोखडातून मुक्त करावे लागेल. मतदारांनी मोठ्या अपेक्षेने दिलेला कौल हा केवळ चेहरा बदलण्यासाठी नसून तो व्यवस्था बदलण्यासाठी आहे. जेव्हा एखादी नवीन व्यवस्था सत्तेवर येते तेव्हा सुरुवातीच्या काळात काही कठोर आणि कदाचित अलोकप्रिय निर्णय घेणे आवश्यक असते. भारताच्या संदर्भातही राज्यांवरील वाढते कर्ज हा आता एक राष्ट्रीय चिंतेचा विषय बनला आहे. अशा स्थितीत पूर्वेकडील या नव्या राजवटीने आर्थिक शिस्तीचा एक नवा पायंडा पाडणे अपेक्षित आहे. उत्पादक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती हेच खऱ्या अर्थाने जनतेचे कल्याण करू शकतात. शेवटी सत्तेचा वापर हा समाजाच्या शेवटच्या घटकाचे जगणे सुसह्य करण्यासाठी व्हायला हवा मात्र ते करताना राज्याची आर्थिक पत रसातळाला जाणार नाही याची काळजी घेणे ही राजधर्माची पहिली अट आहे. पूर्वेचा हा नवा सूर्य केवळ राजकीय मंचावर चमकेल की तो सर्वसामान्य जनतेच्या आयुष्यातील अंधार दूर करेल याचे उत्तर नव्या सरकारच्या पहिल्या काही महिन्यांतील निर्णयांवरून मिळेल. राजकारण हे शक्यतांचा खेळ असला तरी अर्थशास्त्र हे आकड्यांचे कठोर वास्तव असते. या वास्तवाचे भान राखून जर नव्या सरकारने पावले उचलली तरच या विजयाचे सार्थक होईल. अन्यथा ही केवळ एक सत्तांतराची घटना म्हणून इतिहासाच्या पानात जमा होईल आणि जनतेच्या पदरी पुन्हा एकदा आश्वासनांची धूळच उरेल. ही वेळ उत्सवाची नसून आत्मपरीक्षणाची आणि जबाबदारीच्या भान राखण्याची आहे. नव्या राज्यकर्त्यांना आता केवळ भाषणांच्या जोरावर जनतेला भुलवता येणार नाही कारण आजचा मतदार हा निकाल पाहणारा आहे. मोफत सवलतींच्या मृगजळामागे न धावता जर त्यांनी वास्तवाचा ध्यास धरला तरच पूर्वेकडील या राज्यांचे भविष्य उज्ज्वल होईल. ही ऐतिहासिक संधी वाया घालवणे हे राज्याच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे आणि त्याची किंमत पुढच्या अनेक पिढ्यांना मोजावी लागेल.

# ब्रिक्स: नव्या जागतिक रचनेचा घातलेला पाया




दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली उभारलेली जागतिक आर्थिक आणि राजकीय व्यवस्था आता एखाद्या जीर्ण झालेल्या इमारतीसारखी भासू लागली आहे. या इमारतीचे खांब असलेल्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांसारख्या संस्थांनी दशकानुदशके पाश्चात्य हितसंबंध जोपासले आहेत. मात्र रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाने जागतिक अर्थकारणातील अनेक सुप्त पेच उघड केले आहेत.

पाश्चात्य राष्ट्रांनी जेव्हा रशियाला जागतिक वित्तीय व्यवस्थेतून बाहेर काढण्यासाठी डॉलरचे शस्त्र उपसले तेव्हा जगातील अनेक विकसनशील देशांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. आज रशियावर आलेली वेळ उद्या आपल्यावरही येऊ शकते या जाणिवेने एका पर्यायी व्यवस्थेची गरज अधोरेखित केली आणि ब्रिक्स या संघटनेला नवे संजीवनी प्राप्त झाली.

ब्रिक्स हा केवळ ब्राझील आणि रशिया तसेच भारत व चीन आणि दक्षिण आफ्रिका यांचा मर्यादित गट उरलेला नाही. सौदी अरेबिया आणि इराण तसेच इजिप्त आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या देशांच्या समावेशाने या गटाचे भौगोलिक आणि आर्थिक वजन आता कित्येक पटींनी वाढले आहे. जगाच्या एकूण लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक लोक आणि जागतिक उत्पादनातील एक तृतीयांश वाटा आता या गटाकडे आहे. विशेष म्हणजे क्रयशक्तीच्या बाबतीत या गटाने जी सात या प्रगत राष्ट्रांच्या समूहाला केव्हाच मागे टाकले आहे. पाश्चात्य देशांची आर्थिक मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ आणि नैसर्गिक संसाधने या गटाकडे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद आणि भूराजकीय स्पर्धा हा या संघटनेपुढील सर्वात मोठा अंतर्गत अडथळा आहे. चीनला ब्रिक्सच्या माध्यमातून स्वतःची नवी साम्राज्यशाही उभी करायची आहे तर भारताला या व्यासपीठाचा वापर करून एक बहुध्रुवीय जग निर्माण करायचे आहे. या दोन परस्परविरोधी उद्दिष्टांचा मेळ घालणे हे ब्रिक्सच्या दीर्घकालीन यशासाठी अनिवार्य आहे. जर अंतर्गत मतभेद विकोपाला गेले तर ही संघटना केवळ चर्चांचे गुऱ्हाळ बनून राहण्याचा धोका नाकारता येत नाही.

डॉलरच्या जागतिक वर्चस्वाला आव्हान देणे हे ब्रिक्सचे सध्याचे सर्वात मोठे आणि महत्त्वाचे उद्दिष्ट राहिले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात डॉलरऐवजी स्थानिक चलनाचा वापर वाढवणे आणि स्वतःची स्वतंत्र पेमेंट सिस्टिम उभी करणे या हालचाली आता कमालीचा वेग घेऊ लागल्या आहेत. न्यू डेव्हलपमेंट बँक ही संस्था आता जागतिक बँकेला एक सक्षम पर्याय म्हणून उभी राहत आहे. जेव्हा पाश्चात्य संस्था विकसनशील देशांवर जाचक अटी लादतात तेव्हा अशा समांतर व्यवस्थांची गरज अधिक तीव्रतेने भासते. जगाला आता एकाधिकारशाही नको असून त्यांना भागीदारी हवी आहे आणि ब्रिक्स तोच पर्याय देऊ पाहत आहे.

भारताची भूमिका या संपूर्ण जागतिक नाट्यात अत्यंत महत्त्वाची आणि तितकीच नाजूक वळणावर आहे. आपल्याला अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांशी असलेले संबंध टिकवायचे आहेत आणि त्याच वेळी ग्लोबल साऊथ म्हणजेच विकसनशील जगाचे नेतृत्वही करायचे आहे. भारत हा या गटातील असा एकमेव देश आहे जो पाश्चात्य जग आणि विकसनशील देश यांच्यातील विश्वासाचा दुवा बनू शकतो. चीनच्या विस्तारवादी धोरणांना आणि आर्थिक दादागिरीला लगाम घालण्यासाठी भारताला ब्रिक्समधील इतर देशांची साथ हवी आहे.

> » जागतिक सत्तेचा समतोल जेव्हा पश्चिमेकडून पूर्वेकडे झुकू लागतो तेव्हा केवळ नवे गट निर्माण होत नाहीत तर जुन्या संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते आणि अशा वेळी ब्रिक्स हा समूह नव्या रचनेचा आधार ठरतो.

नव्या जागतिक इमारतीचा नकाशा आता ब्रिक्सच्या बैठकीत तयार होत आहे. ही इमारत किती भक्कम आणि टिकाऊ असेल हे त्यातील वीट आणि सिमेंट किती एकजीव होते यावरच अवलंबून असेल. ब्रिक्सने जर आपल्या अंतर्गत विरोधाभासांवर मात केली तर येणारे दशक हे निश्चितच एका नव्या आणि अधिक न्याय्य जागतिक रचनेचे असेल. पाश्चात्य देशांनी या बदलाकडे केवळ संशयाने पाहण्यापेक्षा आपल्या धोरणातील चुकांचे आत्मपरीक्षण करणे अधिक हिताचे ठरेल.

ब्रिक्स हा केवळ देशांचा समूह नसून तो प्रस्थापित व्यवस्थेला विचारलेला एक रोखठोक सवाल आहे. या सवालाचे उत्तर शोधताना जगाला आता अधिक प्रगल्भ आणि सर्वसमावेशक व्हावे लागेल. अन्यथा सत्तेच्या या संघर्षात जगाचे नुकसान अटळ आहे. नव्या जागतिक रचनेसाठी लागणारे सिमेंट आता उपलब्ध झाले आहे आता गरज आहे ती केवळ एका सक्षम वास्तुरचनाकाराची जी भूमिका भारत चोखपणे बजावू शकतो. सत्ता आणि संपत्तीचे विकेंद्रीकरण हाच यापुढील जागतिक शांततेचा एकमेव मार्ग असेल हे निश्चित.

# पीसीएमसी महापालिकेवर ४,४९३ कोटींचा आर्थिक बोजा

## उत्पन्नवाढीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष; होऊ दे खर्च धोरण सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आर्थिक संकटाच्या विळख्यात सापडली असून, महापालिकेच्या डोक्यावर तब्बल ४ हजार ४९३ कोटी रुपयांची देणी असल्याची माहिती समोर आली आहे. लेखा व वित्त विभागाने खर्च नियंत्रण आणि उत्पन्नवाढीसाठी वारंवार सूचना करूनही तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी "होऊ द्या खर्च" धोरण राबवत मोठ्या प्रमाणावर खर्चाला प्राधान्य दिल्याचा आरोप होत आहे.

सन २०२२ ते २०२६ या चार वर्षांच्या प्रशासकीय राजवटीदरम्यान सर्वसाधारण सभा, स्थायी समिती आणि प्रशासन या तिन्ही अधिकारांचा केंद्रबिंदू आयुक्त कार्यालय होते. त्यामुळे लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेण्यात आल्याची टीका होत आहे. त्याचा परिणाम आता नव्याने सभागृहात दाखल झालेल्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांना विकासकामांसाठी निधी मिळवताना जाणवत असल्याचे सांगितले जात आहे.

महापालिकेच्या लेखा विभागाच्या माहितीनुसार, विविध योजनांवरील वार्षिक खर्च १ हजार ५६३ कोटी ६३ लाख रुपयांवर पोहोचला असून, त्यात दरवर्षी वाढ होत आहे. मात्र उत्पन्नवाढीच्या स्रोतांवर अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याने आर्थिक समतोल बिघडत चालल्याची चिंता व्यक्त होत आहे. लेखा व वित्त विभागाने मालमत्ताकर वसुली अधिक प्रभावी करण्यासाठी नव्या मालमत्तांचे सर्वेक्षण तातडीने पूर्ण करण्याची सूचना केली आहे. तसेच थकबाकी वसुली, बांधकाम परवान्यांद्वारे विकास शुल्क संकलन, अग्निशमन, उद्योगधंदे आणि वैद्यकीय परवाने यांचे वेळेत नूतनीकरण करून महसूल वाढवण्यावर भर देण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

महसुली उत्पन्न गोळा करणाऱ्या विभागांचे नियमित मूल्यमापन करून उद्दिष्टपूर्तीबाबत मार्गदर्शन करणे, तसेच कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे आवश्यक असल्याचेही विभागाने नमूद केले आहे. मात्र या सूचनांवर ठोस कार्यवाही झाल्याचे दिसत नसल्याचा आरोप होत आहे. महापालिकेच्या विविध कर आणि शुल्कांमध्ये अनेक वर्षांपासून वाढ करण्यात आलेली नाही. जाहिरात फलक, होर्डिंग, फ्लेक्स, गॅन्ट्री यांचे दर, तसेच गाळ्यांचे भाडे, मालमत्ताकर आणि पाणीपट्टीचे दर वाढवण्याची शिफारस लेखा विभागाने केली आहे. वाढती लोकसंख्या आणि वाढणारा खर्च लक्षात घेता कठोर आर्थिक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे विभागाचे मत आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएमएल) साठीही महापालिकेला मोठा निधी खर्च करावा लागत आहे. संचालन तुटीपोटी दरमहा सुमारे २० कोटी ४५ लाख रुपये द्यावे लागतात. बस खरेदी, वेतन आयोग फरक आणि संचालन तूट मिळून पीएमपीएमएलसाठी वार्षिक ४१७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच स्मार्ट सिटी प्रकल्प बंद करण्यात आल्यानंतरही त्याच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी सुमारे ५० कोटी रुपये खर्च होत आहेत.

महापालिकेच्या खर्चातील मोठा हिस्सा भूसंपादन, पीएमपीएमएल, स्मार्ट सिटी कंपनी, धन्वंतरी स्वास्थ्य योजना, निवृत्तीवेतन, अंशदान निधी, केंद्र शासनाच्या योजना, समाजकल्याण योजना, राखीव निधी, पाटबंधारे विभागाची बिले, स्ट्रीट लाईट आणि पम्पिंग स्टेशनच्या वीजबिलांवर खर्च होत असल्याचे प्रशासनाच्या आकडेवारीत नमूद करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवड हे क्रीडा क्षेत्रात देशाला दिशा देणारे शहर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड हे केवळ औद्योगिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर म्हणून पुढे येत आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा फडकवत असून, त्यांच्या यशामुळे युवा पिढीला प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

किंग मार्शल आर्ट्स संस्था येथील विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भारत-नेपाळ दरम्यान उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे झालेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शहरातील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली होती. या वेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते.

स्पर्धेत थेरगाव येथील चार खेळाडूंनी भारताकडून प्रतिनिधित्व करत शहराचा गौरव वाढवला. त्यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष कामगिरी केली. यापूर्वीही त्यांनी ११ सुवर्णपदके जिंकून सातत्यपूर्ण यश मिळवले आहे. त्यांच्या या कामगिरीची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घेतल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# पीएमपीएमएल बसचे वाढते बेकडाऊन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएमएल) च्या बससेवेतील वाढत्या बेकडाऊनमुळे प्रवाशांचा त्रास पुन्हा वाढला आहे. शहरातील दळणवळणाचे महत्त्वाचे साधन मानल्या जाणाऱ्या पीएमपी बस दररोज विविध मार्गांवर बंद पडत असल्याने प्रवाशांना अर्ध्या प्रवासातच दुसऱ्या बसची वाट पाहावी लागत आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पीएमपीच्या बससेवेवर मोठ्या प्रमाणात नागरिक अवलंबून आहेत. पिंपरी, चिंचवड, निगडी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, वल्लभनगर, मोरवाडी, पिंपरीगाव आणि भोसरी या मार्गांवर धावणाऱ्या बसपैकी दररोज ५० हून अधिक बस बेकडाऊन होत असल्याची माहिती समोर आली आहे. विशेषतः एप्रिल आणि मे महिन्यात बस बंद पडण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शहरातील विविध रस्त्यांवर दररोज दोन ते चार पीएमपी बस बंद पडलेल्या दिसत असल्याने वाहतूक कोंडीबरोबरच प्रवाशांची गैरसोयही वाढत आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, बससेवेची नियमित देखभाल आणि दुरुस्ती वेळेत होत नसल्याने बेकडाऊनचे प्रमाण वाढत आहे. पीएमपी प्रशासनाकडून वारंवार बेकडाऊन कमी करण्याचे आश्वासन दिले जात असले तरी प्रत्यक्षात परिस्थितीत सुधारणा होत नसल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. तिकीट दरवाढीनंतरही दर्जेदार सेवा देण्यात पीएमपी अपयशी ठरत असल्याची नाराजी प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे खासगी ठेकेदारांच्या बसमध्ये बेकडाऊनचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. पिंपरी-चिंचवड परिसरात धावणाऱ्या खासगी बसपैकी सुमारे ३० टक्के बस दररोज रस्त्यात बंद पडत असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे ठेकेदारांच्या बससेवेच्या गुणवत्तेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाढत्या तक्रारींची दखल घेत पीएमपी प्रशासनाने गेल्या आठवड्यात काही कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई केली. तसेच बेकडाऊनचे प्रमाण कमी करण्यासाठी संबंधित ठेकेदारांसोबत बैठका घेऊन सक्त सूचना देण्यात आल्या. मात्र या उपाययोजनांनंतरही रस्त्यांवर बस बंद पडण्याचे प्रकार सुरूच असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

## अनधिकृत प्रार्थनास्थळे पाडल्याने स्थानिकांमध्ये नाराजी

# कुदळवाडीत पुन्हा अतिक्रमणांवर धडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** फेब्रुवारी २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटविल्यानंतर आता पुन्हा त्याच परिसरातील प्रार्थनास्थळांवर कारवाई करण्यात आल्याने स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. एकाच भागाला वारंवार लक्ष्य केले जात असल्याचा आरोप काही नागरिकांनी केला असून, शहरातील इतर भागांतील अनधिकृत प्रार्थनास्थळांवर मात्र कारवाई होत नसल्याबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालयाने सोमवारी पहाटे चिखलीतील कुदळवाडी आणि जाधववाडी परिसरात अनधिकृत बांधकामांवर मोठी कारवाई केली. या मोहिमेत चार प्रार्थनास्थळांसह विविध अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली. संबंधित प्रार्थनास्थळे खासगी जागांवर उभारण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कारवाईदरम्यान कुदळवाडीतील विसावा चौक ते पोलिस चौकी रस्त्यावरील गट क्रमांक ७०० मधील पत्राशेड, जाधववाडी रस्त्यावरील वीटबांधकाम पत्राशेड, कुदळवाडी पोलिस चौकीजवळील गट क्रमांक ६७८ मधील आरसीसी बांधकाम तसेच जाधववाडीतील सावता माळी मंदिर रस्त्यावरील पत्राशेड हटविण्यात आले. या सर्वांमध्ये चार प्रार्थनास्थळांचा समावेश होता. ही कारवाई महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईसाठी बांधकाम परवानगी विभागाचे १२ उपअभियंते, ४ कनिष्ठ अभियंते, २४ बीट निरीक्षक आणि कर्मचारी तैनात करण्यात आले होते. तसेच सुमारे १ हजार २०० पोलिस कर्मचारी आणि २१८ एमएसएफ जवानांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अवघ्या दोन तासांत ही मोहीम पूर्ण करण्यात आली.

महापालिकेच्या माहितीनुसार, सुमारे ४ हजार ३३६.२८ चौरस फूट क्षेत्रावरील अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड हटविण्यात आले.

डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत, "शहरात कोणत्याही प्रकारची अनधिकृत बांधकामे किंवा प्रार्थनास्थळे उभारू नयेत. नियमबाह्य बांधकामांविरोधातील कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहील," असे सांगितले.

याआधी फेब्रुवारी २०२५ मध्येही कुदळवाडी परिसरात मोठी कारवाई करण्यात आली होती. त्या वेळी ४ हजार ५०० हून अधिक भंगार गोदामे, दुकाने, आस्थापना, लघुउद्योग आणि घरांवर कारवाई करून सुमारे ८२५ एकर जागा रिकामी करण्यात आली होती. त्या कारवाईमुळे अनेक लघुउद्योजक आणि कामगार बेरोजगार झाल्याची चर्चा त्यावेळी झाली होती.

# पुणे-नाशिक महामार्गावर 'बॅरियर-लेस' टोल व्यवस्था

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुणे-नाशिक महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाची दिलासादायक बातमी समोर आली आहे. महामार्गावरील टोल वसुलीची पारंपरिक पद्धत आता बदलणार असून, ऑगस्ट महिन्यापासून वाहनधारकांना टोल नाक्यांवर रांगेत थांबण्याची आवश्यकता भासणार नाही. जुन्नरजवळील चाळकवाडी आणि संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथील टोल नाक्यांवर 'मल्टी-लेन फ्री फ्लो' ही अत्याधुनिक बॅरियर-लेस टोलिंग प्रणाली सुरू करण्यात येणार आहे.

केंद्र सरकारकडून देशातील महामार्गांचे आधुनिकीकरण करण्यावर भर दिला जात असून, त्याचाच एक भाग म्हणून ही नवी यंत्रणा लागू केली जात आहे. याआधी दिल्ली-एनसीआर परिसरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते अशाच प्रकारच्या प्रणालीचे उद्घाटन करण्यात आले होते. नवीन व्यवस्थेनुसार टोल नाक्यांवर पारंपरिक बूम बॅरियर्स राहणार नाहीत. त्याऐवजी महामार्गावर अत्याधुनिक आरएफआयडी रीडर्स आणि ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन कॅमेरे बसवले जाणार आहेत. हे उपकरण ताशी ८० ते १०० किलोमीटर वेगाने धावणाऱ्या वाहनांचे फास्टॅग आणि नंबर प्लेट अचूकपणे स्कॅन करतील.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जुन्नर येथे नालेसफाईची पाहणी

**जुन्नर :** पावसाळ्यात नागरिकांना सांडपाणी आणि तुंबलेल्या नाल्यांचा त्रास होऊ नये, यासाठी जुन्नर नगरपरिषद प्रशासनाने पूर्वतयारीला सुरुवात केली आहे. शहरातील सांडपाणी व्यवस्थापन आणि नालेसफाईच्या कामांची नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी प्रत्यक्ष पाहणी करत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. शहरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस होत असल्याने नाल्यांची नियमित साफसफाई आणि सांडपाणी व्यवस्थापन महत्त्वाचे ठरत आहे. शहरातील नाल्यांमधून वाहणारे पावसाचे पाणी पुढे कुकडी नदीला जाऊन मिळते. मात्र, वेळेवर नालेसफाई न झाल्यास पावसाचे पाणी रस्त्यांवर साचण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी शहरातील विविध भागांची पाहणी करून नालेसफाई आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामांचा आढावा घेतला.

### निमगाव भोगी कार्य.च्या अध्यक्षपदी उर्मिला फलके



**रांजणगाव गणपती :** शिरूर तालुक्यातील निमगाव भोगी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी उर्मिला राजाराम फलके यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली.माजी अध्यक्ष रामदास बबन व्यवहारे यांनी इतर संचालकांनाही अध्यक्षपदाची संधी मिळावी या उद्देशाने आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या अध्यक्षपदासाठी निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये उर्मिला फलके यांचा अध्यक्षपदासाठी एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अप्पासाहेब धायगुडे यांनी जाहीर केले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक, सचिव राजू झंजाड तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर ग्रामस्थांच्या वतीने उर्मिला फलके यांचा सत्कार करण्यात आला.

## निधी मंजूर होऊनही काम संथ गतीने; वाहनचालकांमध्ये नाराजी

# अवसरी-पारगाव रस्त्याचे काम रखडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** अवसरी फाटा ते पारगाव, जांबुत या सुमारे ७५ किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरण व सिमेंट कॉँक्रिटीकरणासाठी ४१८ कोटी रुपयांचा निधी मंजूर होऊनही काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने वाहनचालक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या कामामुळे अवसरी खुर्द ते अवसरी बुद्रुक दरम्यानचा रस्ता अक्षरशः खड्डेमय झाला असून वाहनचालकांना खड्ड्यांतून रस्ता शोधत प्रवास करावा लागत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, निरगुडसर, पारगावसह १५ ते २० गावांसाठी अवसरी मार्गे जाणारा हा प्रमुख संपर्क रस्ता आहे. या मार्गावर भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे ऊस वाहतूक करणारे ट्रक, दुधाचे टँकर, भाजीपाल्याची वाहने, वाळू-मुरूम वाहतूक करणारे हायवा, खासगी वाहने तसेच एसटी बसची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. दररोज पहाटे चार ते रात्री एक वाजेपर्यंत सुमारे अडीच ते तीन हजार वाहनांची ये-जा या मार्गावर होत असते.

रस्ता अरुंद असल्याने वारंवार वाहतूक कोंडी व अपघात होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार अवसरी फाटा–निरगुडसर–पारगाव–पिंपरखेड–जांबुत–शिक्रापूर या मार्गाच्या रुंदीकरण व सिमेंट कॉँक्रिटीकरणासाठी ४१८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार संबंधित ठेकेदाराला काम देण्यात आले. सुरुवातीला अवसरी बुद्रुक–निरगुडसर या टप्प्यात काम सुरू झाले; मात्र अवसरी खुर्द ते अवसरी बुद्रुक रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली आहे. रस्त्यावरील डांबरीकरण पूर्णपणे उखडले गेले असून मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. गेल्या वर्षभरापासून खड्डे बुजविण्याची मागणी करूनही संबंधित ठेकेदाराकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदाराला राजकीय पाठबळ कोणाचे, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील तसेच जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील हेही या मार्गावरून प्रवास करत असतानाही रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तातडीने अवसरी खुर्द ते अवसरी बुद्रुक रस्त्याचे तात्पुरत्या स्वरूपात डांबरीकरण करण्यात यावे, अन्यथा संबंधित ठेकेदाराकडून काम काढून घ्यावे, अशी मागणी वाहनचालक आणि ग्रामस्थांनी केली आहे. मागील दहा महिन्यांपासून रस्त्याच्या कडेला गटारीचे आरसीसी बांधकाम सुरू करण्यात आले होते. मात्र हे कामही अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. या मार्गावरील अनेक पुलांचे काम पूर्ण झालेले नसून काही पूल अर्धवट अवस्थेत आहेत. जे पूल पूर्ण झाले आहेत, तेही व्यवस्थित सपाट न केल्याने त्यावर मोठ्या प्रमाणावर दगड पडलेले आहेत. त्यामुळे वाहनचालक घसरून अपघातग्रस्त होत असल्याच्या घटना घडत आहेत. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

## घसरलेल्या बाजारभावामुळे कांदा उत्पादक शेतकरी संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** उत्तर पुणे जिल्ह्यात कांद्याच्या घसरलेल्या बाजारभावामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. बाजार समित्यांमध्ये कांद्याला अत्यंत कमी दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची संतप्त भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

खते, बियाणे, औषधे, मजुरी, वाहतूक आणि साठवणूक यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करूनही बाजार समित्यांमध्ये कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. अनेक बाजारपेठांमध्ये हमाली, तोलाई आणि इतर खर्च वजा गेल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात अत्यंत कमी रक्कम उरत असल्याचे चित्र आहे.

केंद्र सरकारच्या कांदा निर्यात धोरणातील अनिश्चिततेचाही कांदा उत्पादकांना मोठा फटका बसत असल्याची चर्चा आहे. निर्यात मर्यादा, शुल्क आणि खरेदी धोरणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय कांद्याची स्पर्धात्मकता कमी झाल्याची भावना तज्ज्ञ शेतकरी व्यक्त करत आहेत. कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने हमीभाव जाहीर करावा, नाफेडमार्फत मोठ्या प्रमाणावर कांदा खरेदी करावी तसेच निर्यात धोरण स्थिर ठेवावे, अशी मागणी आंबेगाव तालुका किसान काँग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब इंदोरे आणि तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी केली आहे.

कांदा लिलाव प्रक्रियेत स्पर्धात्मक बोली लागत नसल्याने दर कृत्रिमरीत्या कमी ठेवले जात असल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून केली जात आहे. कांद्याचे पडलेले भाव सुधारण्यासाठी बाजार समितीने व्यापारी आणि शेतकरी यांची संयुक्त बैठक घेतल्याचे यापूर्वी दिसून आले नसल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

## महसूल विभागाच्या कारभाराविरोधात 'धरणे'




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** महसूल विभागाशी संबंधित विषयांवर शासन आणि महसूलमंत्र्यांच्या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करत तसेच सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळत नसल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते अशोक टाव्हरे यांनी सोमवारी उपविभागीय अधिकारी तथा प्रांत कार्यालय, राजगुरुनगर येथे धरणे आंदोलन केले.

यावेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष दिलीप माशेरे, जऊळके खुर्दचे माजी सरपंच सुभाष बोऱ्हाडे, कनेरसरच्या सरपंच सुनीता केदारी, कांतिराम बोऱ्हाडे, सायगाव सोसायटीचे अध्यक्ष सुदाम बोरकर, मधुकर बोरकर, तुकाराम दौंडकर, प्रदीप कर्पे, बाळाजी शेटे, अविनाश नळकांडे, शिवसेनेचे वैद्यकीय कक्ष जिल्हाप्रमुख सुनील पवार, बबनराव खेसे, विश्वास सातकर, किरण बाविस्कर, नेहा काटकर, रमेश गोडसे, कल्पना सुकाळे, प्राजक्ता कडलग, मधुकर दौंडकर, परेश रावल, राहुल अभंग, दिपक जगताप, मंगेश नढे, सदाशिव गारगोटे यांच्यासह बाधित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी आंदोलकांची भेट घेत चांडोली (ता. खेड) येथील गट क्रमांक १२६ संदर्भातील अहवालाची प्रत अशोक टाव्हरे यांना दिली. तसेच इतर मागण्यांवर दोन दिवसांत तातडीने कार्यवाही करण्याची ग्वाही दिली. यासंदर्भात तहसीलदार प्रशांत बेडसे यांनाही आवश्यक निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात आले. चांडोली येथील गट क्रमांक १२६ बाबत तत्कालीन तहसीलदार सुचित्रा आमले यांनी केलेल्या कथित अनधिकृत कार्यवाहीसंदर्भातील प्रलंबित अहवाल उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविल्याची माहिती देण्यात आली. तसेच इतर मागण्यांवरही सकारात्मक भूमिका घेतल्याने अशोक टाव्हरे व इतर नागरिकांनी आंदोलन स्थगित केले.

## २८ व्या पुण्यतिथीनिमित्त कारखाना कार्यस्थळावरील स्मारकस्थळी

# दत्तात्रय वळसे पाटील यांना अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे आद्य संस्थापक स्वर्गीय दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील (दादा) यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त कारखाना कार्यस्थळावरील स्मारकस्थळी तसेच भीमाशंकर शिक्षण संस्थेच्या प्रांगणात विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील, संचालक अशोक घुले, रामचंद्र ढोबळे, बाबासाहेब खालकर, दादाभाऊ पोखरकर, शांताराम हिंगे, आनंदराव शिंदे, मच्छिंद्र गावडे, बाजीराव बारवे, ज्ञानेश्वर अस्वारे, नितीन वाव्हळ, रामहरी पोंदे, पोपटराव थिटे, संचालिका प्रिया बाणखेले, जनरल मॅनेजर शिरीष सुर्वे, सेक्रेटरी रामनाथ हिंगे, किशोर तिजारे, दिलीप कुरकुटे, प्रतापसिंह सावंत, सुरेश शिंदे, अमीर पठाण, ब्रिजेश लोहोट, अनिल बोंबले, कैलास गाढवे, बी. डी. चव्हाण, नाथा मोकाटे, वसंत जाधव यांच्यासह कामगार व शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना व्हाईस चेअरमन प्रदीप वळसे पाटील म्हणाले, "स्व. दत्तात्रय वळसे पाटील यांनी आयुष्यभर सर्वसामान्य शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देत कार्य केले. दुष्काळी परिस्थितीशी झुंजणाऱ्या आंबेगाव तालुक्यात शिक्षण, सहकार, सिंचन आणि पायाभूत सुविधांची विकासदृष्टी त्यांनी रुजवली. त्यातूनच आजचा प्रगत तालुका घडताना दिसत आहे."

ते म्हणाले, "दादांची कार्यपद्धती, लोकांशी असलेली जवळीक आणि समाजकारणाकडे पाहण्याची सर्वसमावेशक भूमिका आजही प्रेरणादायी आहे. त्यांनी जपलेली विकास आणि जनसेवेची परंपरा पुढे नेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल."

## पाणीटंचाईचा फ्लॉवरला फटका



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या फ्लॉवर काढणीची कामे सुरू असतानाच पाणीटंचाईमुळे अनेक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. आधीच फ्लॉवरला कमी बाजारभाव मिळत असताना आता पाण्याच्या ताणामुळे पिकावर रोगराई वाढू लागल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

तालुक्यातील रांजणी गावच्या थोरात मळा परिसरात अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर फ्लॉवरची लागवड केली होती. सुरुवातीला पीक चांगल्या स्थितीत होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून वाढत्या उन्हाचा तडाखा आणि पाण्याअभावी पिकावर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. पाण्याचा ताण बसल्याने फ्लॉवरचे गड्डे पिवळे पडत असून काही ठिकाणी कुजण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे बाजारपेठेत या मालाला मागणी कमी होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

सध्या फ्लॉवरला मिळणारा बाजारभाव अत्यंत कमी असून त्यात मजुरी, वाहतूक आणि औषध फवारणीचा खर्च वाढल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची परिस्थिती आहे. बाजारात माल नेल्यानंतरही हातात काहीच राहत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी फ्लॉवर काढणी बंद केली आहे. काही ठिकाणी तर पीक शेतातच सोडून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

मोठ्या अपेक्षेने फ्लॉवरची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना उत्पादन खर्चात वाढ, बाजारभावातील घसरण आणि पाणीटंचाई या तिहेरी संकटाचा सामना करावा लागत असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

## मंचर बाजार समितीत कांद्याच्या आवकेत वाढ




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक वाढली असून बाजारभाव स्थिर असल्याची माहिती सभापती निलेश थोरात यांनी दिली. मंगळवारी बाजार समितीत १४ हजार २६० पिशव्यांची आवक झाली असून चांगल्या प्रतीच्या कांद्याला प्रति दहा किलोस १३० रुपये असा उच्चांकी दर मिळाला.

मंगळवारी बाजार समितीत लिलाव पद्धतीने कांद्याची विक्री करण्यात आली. बाजार समितीत नंबर १ सुपर गोळा कांद्याला प्रति दहा किलो १२० ते १३० रुपये, नंबर २ कांद्याला ९० ते १२० रुपये, गोल्टी व गोल्टा कांद्याला ४० ते ८० रुपये, तर बदला कांद्याला १० ते ४० रुपये असा बाजारभाव मिळाला. कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असतानाही बाजारभाव स्थिर राहिल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

## आळंदी येथे महाराजस्व समाधान शिबिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** आळंदी (ता. खेड) मंडळ विभागात मंगळवारी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. फ्रुटवाले धर्मशाळा येथे प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेले हे शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले.

महसूल विभागासह विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेतून विविध विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. शिबिरामध्ये नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

ई-फेरफार प्रणाली अंतर्गत एकूण ९४ फेरफार निर्गत करण्यात आले. तसेच ८-अ चे २४० उतारे आणि ६५५ सातबारा उताऱ्यांचे वितरण करण्यात आले. कलम १५५ अंतर्गत २ अर्ज प्राप्त झाले. याशिवाय ३७ कुटुंबांना रेशनकार्ड वाटप करण्यात आले, तर ४१ नवीन अर्ज प्राप्त झाल्याची माहिती नायब तहसीलदार राम बीजे यांनी दिली. पीएम किसान योजनेअंतर्गत २ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील २३ लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले, तर ३ नवीन अर्ज प्राप्त झाले. शालेय विद्यार्थ्यांना १०५ अधिवास प्रमाणपत्रे, २६९ जात प्रमाणपत्रे देण्यात आली. तसेच ६५ अर्ज प्राप्त झाले. उत्पन्न दाखल्यांसाठी १४० अर्ज मंजूर करण्यात आले, तर ५५ अर्ज प्राप्त झाले. कृषी विभागामार्फत ८८ लाभार्थ्यांना महाडीबीटी योजनेचा लाभ देण्यात आला. सिटी सर्व्हे नोंदणीसाठी १ अर्ज, भूमी अभिलेखासाठी ३ अर्ज प्राप्त झाले. तसेच १२५ आधारकार्ड आणि १३२ आयुष्मान कार्डांचे वितरण करण्यात आले. एकूण २ हजार ३६३ दाखले आणि विविध योजनांचा लाभ मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आला. जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत वारस नोंदी मंजूर करून दुरुस्त सातबारा लाभार्थ्यांना देण्यात आले. आधार कार्ड केंद्रामार्फत ७ लाभार्थ्यांचे आधार अपडेट करण्यात आले. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना बियाणे अर्ज आणि महाडीबीटी योजनांची माहिती देण्यात आली. तसेच फळबाग लागवडीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य विभागामार्फत ४५ लाभार्थ्यांना वैद्यकीय सेवा देण्यात आली. महिला व बालविकास विभागाने विविध योजनांची माहिती नागरिकांना दिली. तहसील कार्यालय खेड आणि नगरपरिषद आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य निवडणूक आयोगाच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत ६० मतदारांचे मॅपिंग करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडल अधिकारी प्रशांत शेटे यांनी केले.

## लग्न मोडता मोडता वाचल्याची घटना समोर

# नवरदेवाचे बूट चोरण्याच्या प्रथेतून वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** विवाहसोहळ्यांमधील पारंपरिक प्रथांमुळे निर्माण होणारे वाद सध्या चर्चेचा विषय ठरत असून, शिरूर तालुक्यातील एका विवाहसोहळ्यात नवरदेवाचे बूट चोरण्याच्या प्रथेतून झालेल्या वादामुळे लग्न मोडता मोडता वाचल्याची घटना समोर आली आहे.

सध्या शिरूर तालुक्यासह परिसरात विवाहसोहळ्यांचा हंगाम सुरू असून विविध गावांमध्ये मोठ्या उत्साहात लग्ने पार पडत आहेत. मात्र काही पारंपरिक प्रथांमुळे वाद निर्माण होण्याच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. विशेषतः नवरी-नवरदेवाला हार घालताना उचलून घेणे तसेच नवरदेवाचे बूट चोरण्याच्या प्रथेमुळे तरुणांमध्ये वाद होत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी या प्रकारांत दुखापतीही झाल्या आहेत.

तालुक्यातील एका गावात झालेल्या विवाहसोहळ्यात नवरीकडील तरुणांनी प्रथेनुसार नवरदेवाचे बूट चोरण्याचा प्रयत्न केला. यावेळी नवरीच्या भावाने नवरदेवाला उचलण्याचा प्रयत्न केला असता त्याचा तोल जाऊन नवरदेव खाली पडला. हा प्रकार पाहताच नवरदेवाकडील मंडळी संतप्त झाली. क्षणार्धात वातावरण तणावपूर्ण बनले आणि दोन्ही बाजूंमध्ये जोरदार शाब्दिक वाद सुरू झाला. काही वेळातच या वादाचे रूपांतर धक्काबुक्की व भांडणात झाले.


दरम्यान, नवरदेवाने स्वतः मध्यस्थी करत परिस्थिती शांत केली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेनंतर विवाहसोहळ्यांमधील पारंपरिक प्रथा साजऱ्या करताना संयम आणि सुरक्षिततेचे भान ठेवण्याची गरज असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

विवाहसोहळ्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांकडूनही तरुणांना वारंवार सूचना दिल्या जात आहेत. "उत्साहाच्या भरात कोणाला दुखापत होणार नाही याची काळजी घ्या. नवरदेवाला उचलण्याचे प्रकार टाळा," अशा सूचना अनेक ठिकाणी दिल्या जात असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

विवाहसोहळ्यातील प्रथा या आनंद आणि उत्साहासाठी असतात, वादासाठी नाहीत. मात्र उत्साहाच्या भरात मर्यादा ओलांडल्याने भांडणे आणि दुखापतींच्या घटना घडत आहेत. त्यामुळे तरुणांनी परंपरा जपत संयम राखावा आणि ज्येष्ठांच्या सूचनांचा आदर करून विवाहसोहळे आनंदात पार पाडावेत, असे आवाहन रांजणगाव गणपती येथील पोपट पाचंगे यांनी केले आहे.

## पिंपळगाव फाटा येथील अपघातात युवक ठार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** पुणे-नाशिक महामार्गावरील मंचर शहरातील पिंपळगाव फाटा येथे मंगळवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात एका २७ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत असलेली युवती गंभीर जखमी झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव फाटा चौकात एका चारचाकी वाहनाने दुचाकीला कट मारल्याने दुचाकीवरील युवक व युवती यांचा तोल गेला. दोघेही रस्त्यावर पडताच मागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांना चिरडले. त्यामुळे हा भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत धाराशिव येथील रहिवासी ऋषिकेश सुर्वे याचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या युवतीला स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने मंचर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, अपघातानंतर काही काळ पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.

## सारांश वृत्त

### केरळमध्ये पावसामुळे हाहाकार

**तिरुवनंतपुरम:** सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या मुसळधार उन्हाळी पावसामुळे केरळच्या अनेक भागांमध्ये, विशेषतः उंच पर्वतरांगांमध्ये, घरे, रस्ते आणि वीजपुरवठा पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. उन्मळून पडलेल्या झाडांमुळे आणि तुटलेल्या वीज तारांमुळे विविध जिल्ह्यांमध्ये दैनंदिन जीवन विस्कळीत झाले, वीजपुरवठा खंडित झाला आणि वाहतूक ठप्प झाली.

### हिमाचल राज्यपालांचेही बचतीचे उपाय

**शिमला** : हिमाचलचे राज्यपाल कविंदर गुप्ता यांनी बुधवारी लोक भवनला 'इंधन संवर्धन क्षेत्र' म्हणून घोषित केले आणि विद्यापीठांना संवर्धन चळवळीचे नेतृत्व करण्याचे आवाहन केले. पश्चिम आशियातील संकटाच्या पार्श्वभूमीवर इंधन वापर कमी करण्याच्या आणि आत्मनिर्भर होण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देत, राज्यपालांनी लोक भवनाला 'इंधन संवर्धन क्षेत्र' म्हणून घोषित करणे, 'पेट्रोलमुक्त रविवार' पाळणे, ज्या दिवशी कोणतेही शासकीय वाहन इंधन वापरणार नाही, यांसारख्या अनेक उपाययोजना जाहीर केल्या. भारताच्या सामूहिक प्रतिसादात हिमाचल प्रदेशला एक आदर्श राज्य म्हणून स्थान देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे ते म्हणाले.

### एअर इंडियाच्या सेवांमध्ये कपात

**नवी दिल्ली** : हवाई क्षेत्रावरील निर्बंध आणि जेट इंधनाच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर, एअर इंडियाने बुधवारी आंतरराष्ट्रीय उड्डाणे कमी करण्याची आणि दिल्ली-शिकागोसह सहा मार्गांवरील सेवा तात्पुरती स्थगित करण्याची घोषणा केली. एअरलाइनने सांगितले की, सेवांचे नुकतेच जाहीर केलेले सुसूत्रीकरण जून-ऑगस्ट या कालावधीत लागू होईल. जेट इंधनाच्या किमती वाढणे, यांसारख्या अनेक घटकांच्या परिणामामुळे काही नियोजित सेवांच्या व्यावसायिक व्यवहार्यतेवर लक्षणीय परिणाम होत आहे.

### विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने १४४ मते

# विजय सरकारने बहुमत केले सिद्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाचे प्रमुख सी. जोसेफ विजय यांनी बुधवारी विधानसभेत बहुमत सिद्ध केले. विश्वासदर्शक ठरावाच्या मतदानात विजय सरकारच्या बाजूने १४४ आमदारांनी मतदान केले, तर २२ आमदारांनी विरोधात मतदान केले. पाच आमदारांनी तटस्थ भूमिका घेत मतदानापासून दूर राहणे पसंत केले.

२३४ सदस्यीय तामिळनाडू विधानसभेत बहुमतासाठी ११८ मतांची आवश्यकता होती. टीव्हीकेकडे स्वतःच्या जागांसह मित्रपक्षांचा पाठिंबा मिळाल्याने विजय सरकारला स्पष्ट बहुमत मिळाले. काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय), मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय-एम), विदुथलाई चिरुथैगल काची (व्हीसीके), इंडियन युनियन मुस्लिम लीग (आययूएमएल) तसेच काही अपक्ष आणि एआयएडीएमकेमधील बंडखोर आमदारांनी सरकारला पाठिंबा दिला.

दरम्यान, द्रमुकने (डीएमके) मतदानावेळी सभात्याग केला. भाजपच्या एकमेव आमदाराने तटस्थ भूमिका घेतली, तर पीएमकेच्या काही आमदारांनीही मतदानात भाग घेतला नाही. विश्वासदर्शक ठराव मांडताना मुख्यमंत्री विजय यांनी सरकार पारदर्शक आणि जनतेसमोर जबाबदार राहील, असे आश्वासन दिले. "हा केवळ राजकीय औपचारिकतेचा भाग नसून जनतेसमोर दिलेले उत्तरदायित्वाचे वचन आहे," असे विजय यांनी विधानसभेत सांगितले.

विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांनी विजय सरकारवर 'हॉर्स ट्रेडिंग'चे आरोप करत सरकारच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्याला प्रत्युत्तर देताना विजय यांनी "आम्ही हॉर्स ट्रेडिंगवर नाही, तर हॉर्स स्पीडवर विश्वास ठेवतो," असे सांगत सरकार स्थिर राहील, असा दावा केला. विश्वासदर्शक ठरावादरम्यान एआयएडीएमकेत मोठी फूट पडल्याचे चित्र दिसून आले.

पक्षप्रमुख एडप्पडी के. पलानीस्वामी यांनी आमदारांना सरकारविरोधात मतदान करण्याचे निर्देश दिले होते. मात्र सी. व्ही. शन्मुगम आणि एस. पी. वेलुमनी यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गटातील सुमारे २५ आमदारांनी विजय सरकारच्या बाजूने मतदान केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, तामिळनाडू विधानसभा इतिहासात प्रथमच विश्वासदर्शक ठरावाचे कामकाज थेट प्रक्षेपित करण्यात आले. विधानसभेचे अध्यक्ष जे. सी. डी. प्रभाकर यांनी घेतलेल्या या निर्णयाचे अनेक नागरी संघटनांनी स्वागत केले. या बहुमत चाचणीमुळे अभिनेता ते मुख्यमंत्री असा राजकीय प्रवास करणाऱ्या विजय यांच्या नेतृत्वाला मोठे बळ मिळाल्याचे मानले जात आहे.

# पाकिस्तानसोबत संवादही सुरू ठेवावा : होसबळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी पाकिस्तानकडून सीमापार दहशतवादाला मिळणाऱ्या पाठिंब्याला भारताने ठोस आणि कठोर प्रत्युत्तर देत राहिले पाहिजे, असे मत व्यक्त केले. मात्र संवादाचे दरवाजे कायम खुले ठेवण्याची भूमिकाही त्यांनी मांडली.

होसबळे म्हणाले की, भारताने राष्ट्रीय सुरक्षा आणि आत्मसन्मानाच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड करता कामा नये. पुलवामासारख्या घटना घडवण्याचे प्रयत्न झाल्यास परिस्थितीनुसार योग्य आणि कठोर उत्तर देणे आवश्यक आहे. पाकिस्तान पुलवामासारखे हल्ले घडवत असेल, तर देशाच्या सुरक्षेसाठी योग्य प्रतिसाद देणे गरजेचे आहे. राष्ट्राची सुरक्षा आणि आत्मसन्मान अबाधित ठेवणे हे सरकारचे कर्तव्य आहे, असे होसबळे यांनी स्पष्ट केले. मात्र, दहशतवादाविरोधातील कठोर भूमिकेसोबतच मुत्सद्देगिरी आणि संवादही महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. यासाठी त्यांनी माजी पंतप्रधान वाजपेयी यांच्या कार्यकाळाचा दाखला दिला. "अटलजींनी दहशतवादाविरोधात ठाम भूमिका घेतानाच पाकिस्तानसोबत संवादाचाही प्रयत्न केला. ते बसने लाहोरला गेले होते. सध्याच्या पंतप्रधानांनीही शपथविधीला पाकिस्तानला निमंत्रित केले होते. त्यामुळे संवादाचे प्रयत्न सुरू राहणे आवश्यक आहे," असे ते म्हणाले.

भारताने पाकिस्तानसोबतचे राजनैतिक संबंध, व्यापार, व्हिसा प्रक्रिया आणि क्रीडा संबंध पूर्णपणे तोडू नयेत, असेही होसबळे यांनी सांगितले. "संवादासाठी नेहमीच काहीतरी दार खुले असणे आवश्यक आहे. नागरी समाजातील संबंध आणि सांस्कृतिक नाते हे भविष्यात सकारात्मक भूमिका बजावू शकतात," असे त्यांनी नमूद केले. भारत आणि पाकिस्तानमधील क्रीडा देवाणघेवाण पुन्हा सुरू होण्याची शक्यता ही आशेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

# अधिकारी भवानीपूरची जागा राखणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत दोन विधानसभा मतदारसंघांतून विजयी झालेले पश्चिम बंगालचे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी भवानीपूर मतदारसंघ कायम ठेवणार असून नंदीग्रामची जागा सोडणार असल्याची घोषणा बुधवारी केली.

सुवेंदू अधिकारी यांनी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या भवानीपूर मतदारसंघातून विजय मिळवला. त्यांनी ममता बॅनर्जी यांचा १५ हजार १०५ मतांच्या फरकाने पराभव केला. तसेच नंदीग्राम मतदारसंघातही त्यांनी तृणमूल काँग्रेसचे उमेदवार पवित्र कर यांचा ९ हजार ६६५ मतांनी पराभव केला होता.

अधिकारी यांनी बुधवारी सकाळी भवानीपूर मतदारसंघाचे आमदार म्हणून पश्चिम बंगाल विधानसभेत शपथ घेतली. यावेळी पत्रकारांशी बोलताना अधिकारी म्हणाले, "नंदीग्राममधून पोटनिवडणुकीत दुसरे कोणी आमदार म्हणून निवडून येतील. मात्र पुढील पाच वर्षांत नंदीग्रामच्या जनतेला माझी अनुपस्थिती जाणवू देणार नाही. मी दिलेली सर्व विकासकामांची आश्वासने पूर्ण करणार आहे." तसेच, "मी अधिकृत आमदार नसतानाही २००८ मधील नंदीग्राम पोलीस गोळीबारातील शहीदाच्या आई फिरोजा बीबी यांना पूर्ण पाठिंबा दिला होता. यावेळीही तीच भूमिका कायम राहील," असेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाबाबत विचारले असता अधिकारी म्हणाले, पंतप्रधान आमचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी दाखवलेल्या मार्गाचे आम्ही पालन करू. मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यात केवळ अत्यावश्यक वाहने ठेवावीत, असे निर्देश पोलीस महासंचालकांना दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# केरळमधील एमबीबीएस विद्यार्थ्यापर्यंत धागेदोरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर** : नीट-यूजी २०२६ परीक्षेतील कथित प्रश्नपत्रिका लीक प्रकरणात राजस्थान स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप (एसओजी) तपासात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्ष परीक्षेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांसारखेच प्रश्न असलेली 'अंदाजित प्रश्नपत्रिका' केरळमध्ये शिक्षण घेणाऱ्या राजस्थानमधील सीकर येथील एका एमबीबीएस विद्यार्थ्याकडून प्रसारित झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

एसओजीचे महानिरीक्षक अजय पाल लांबा यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थ्याला हे साहित्य सुरुवातीला एका मित्रामार्फत मिळाले होते. त्यानंतर त्याने ती प्रश्नपत्रिका सीकरमधील ओळखीच्या व्यक्तींना पाठवली. पुढे ती कोचिंग विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पसरली आणि ३ मे रोजी होणाऱ्या नीट-यूजी परीक्षेपूर्वी जयपूरसह आसपासच्या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हे साहित्य राजस्थानमध्ये पोहोचण्यापूर्वी हरियाणातील गुरुग्राम येथील एका व्यक्तीमार्फत पाठवण्यात आले होते.

तपासात असेही समोर आले आहे की, संबंधित एमबीबीएस विद्यार्थ्याने ही 'अंदाजित प्रश्नपत्रिका' सीकरमधील एका वसतिगृह मालकाला आणि काही मित्रांनाही दिली होती. त्यानंतर त्या वसतिगृह मालकाने परीक्षेच्या तयारीसाठी उपयुक्त ठरेल या कारणाने ती प्रश्नपत्रिका वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये प्रसारित केली. मात्र, नंतर या दस्तऐवजाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याच वसतिगृह मालकाने स्थानिक पोलिसांना माहिती दिली. विद्यार्थ्यांमध्ये संशयास्पद प्रश्नसंच वितरित करण्यात आल्याची तक्रारही करण्यात आली.

नीट पेपरफुटीच्या शक्यतेबाबत अफवा आणि माहिती समोर आल्यानंतर एसओजी आणि राजस्थान पोलिसांच्या संयुक्त पथकांनी सीकर, झुंझुनू, अलवर, जयपूर शहर आणि जयपूर ग्रामीण भागात मोठी चौकशी मोहीम राबवली. या कारवाईत १५० हून अधिक विद्यार्थ्यांची, त्यांच्या पालकांची आणि संबंधित व्यक्तींची चौकशी करण्यात आली.

एसओजीने तपासातून समोर आलेली माहिती राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए)कडे दिल्यानंतर केंद्र सरकारने नीट-यूजी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपवण्यात आला.

# काँग्रेस नेते पवन खेरा पोलिसांसमोर हजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी** : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान शर्मा यांच्याबाबत केलेल्या आरोपांच्या प्रकरणात काँग्रेस नेते पवन खेरा बुधवारी आसाम पोलिसांच्या गुन्हे शाखेसमोर चौकशीसाठी हजर झाले.

मुख्यमंत्री सरमा यांच्या पत्नींकडे अनेक पासपोर्ट तसेच परदेशात अघोषित मालमत्ता असल्याचा आरोप पवन खेरा यांनी केला होता. त्यानंतर रिनिकी भुयान शर्मा यांनी गुवाहाटी गुन्हे शाखा पोलीस ठाण्यात खेरा आणि इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार फौजदारी तक्रार दाखल केली होती.

गुन्हे शाखेच्या कार्यालयाबाहेर पत्रकारांशी बोलताना खेरा म्हणाले, "पोलिसांनी मला चौकशीसाठी बोलावले होते आणि त्यानुसार मी येथे आलो आहे. आम्ही कायदा आणि न्यायव्यवस्थेचा आदर करतो. चौकशी पूर्ण झाल्यानंतर मी सविस्तर भूमिका मांडेन."

खेरा यांच्याविरोधातील आरोपांमध्ये निवडणुकीसंदर्भात खोटी माहिती देणे, फसवणूक, बनावटगिरी, बनावट कागदपत्रांचा वापर, शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे आणि बदनामी करणे या कलमांचा समावेश आहे. यापूर्वी आसाम पोलिसांनी दिल्लीतील खेरा यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्यानंतर खेरा यांनी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेत ट्रान्झिट अटकपूर्व जामीन मिळवला होता. मात्र, आसाम पोलिसांनी त्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने ट्रान्झिट जामिनाला स्थगिती देत खेरा यांना गुवाहाटी उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले होते. गुवाहाटी उच्च न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर त्यांनी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

### ट्रम्प यांच्या चीन दौऱ्यापूर्वी बीजिंगचा इशारा

# अमेरिकेसमोर चार 'लक्ष्मणरेषा'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बीजिंग/वॉशिंग्टन** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर रवाना झाले असून, या दौऱ्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. इराणमधील संघर्ष, अमेरिका-चीन व्यापारयुद्ध आणि तैवान प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यातील बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या भेटीपूर्वीच चीनने अमेरिकेसाठी चार 'लक्ष्मणरेषा' आखत स्पष्ट इशारा दिला आहे.

अमेरिकेतील चिनी दूतावासाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत अमेरिकेने चीनच्या चार महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये हस्तक्षेप करू नये, असे म्हटले आहे. या पोस्टमध्ये चीन-अमेरिका संबंधांतील "चार रेड लाईन्स" स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

चिनी दूतावासाने म्हटले आहे की, "चीन-अमेरिका संबंधांमध्ये चार महत्त्वाच्या लक्ष्मणरेषा आहेत. त्या म्हणजे तैवानचा प्रश्न, लोकशाही आणि मानवाधिकारांचा मुद्दा, चीनची राजकीय व्यवस्था आणि चीनच्या स्वतंत्र विकासाचा अधिकार. अमेरिकेने या मुद्द्यांना आव्हान देऊ नये."

चीनने असेही स्पष्ट केले की, दोन्ही देशांनी रचनात्मक आणि स्थिर संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. सामरिक स्तरावर परस्पर विश्वास आणि स्थैर्य टिकवून ठेवणे ही काळाची गरज असल्याचेही चीनने नमूद केले.

चीनने यापूर्वीही या 'रेड लाईन्स'चा उल्लेख केला होता. नोव्हेंबर २०२४ मध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि तत्कालीन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्यात झालेल्या बैठकीतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी शी जिनपिंग यांनी अमेरिकेने या मर्यादा ओलांडू नयेत, असे स्पष्टपणे सांगितले होते.

विशेषतः तैवानच्या मुद्द्यावर चीन अत्यंत संवेदनशील भूमिका घेत आहे. चीन 'वन चायना' धोरणांतर्गत तैवानला आपल्या भूभागाचा भाग मानतो. मात्र अमेरिकेकडून तैवानला मिळणारे वाढते समर्थन आणि शस्त्रपुरवठ्याच्या घोषणांमुळे बीजिंगची नाराजी वाढली आहे. ट्रम्प आणि शी जिनपिंग यांच्या बैठकीत तैवानचा मुद्दा प्रमुख ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चीनच्या तैवान व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते झांग हान यांनी याबाबत कठोर भूमिका मांडली आहे.

"तैवान हा पूर्णपणे चीनचा अंतर्गत विषय आहे. अमेरिकेने या प्रश्नावर कोणतेही भाष्य करू नये," असे झांग हान यांनी म्हटले. तसेच तैवानसोबत अमेरिकेचे कोणत्याही प्रकारचे अधिकृत संबंध प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना चीनचा तीव्र विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# पंतप्रधान मोदींनी कमी केली ताफ्यातील वाहने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इंधन बचत आणि काटकसरीच्या उपाययोजनांचे आवाहन केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शासकीय ताफ्याचा आकार मोठ्या प्रमाणात कमी केल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे. हैदराबादमधील भाषणानंतर गुजरात आणि आसाम दौऱ्यांदरम्यान हा कमी आकाराचा ताफा वापरण्यात आल्याचे सांगण्यात आले.

सूत्रांच्या माहितीनुसार, एसपीजीच्या 'ब्लू बुक'मधील अनिवार्य सुरक्षा नियम कायम ठेवून ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्यात आली आहे. तसेच नवीन वाहने खरेदी न करता शक्य त्या ठिकाणी इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश करण्याचे निर्देशही पंतप्रधानांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी एसपीजीकडून सुरू करण्यात आली आहे. पंतप्रधानांनी इंधनाचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केल्यानंतर केंद्रीय गृहमंत्र्यांनीही आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या निम्म्याहून कमी करण्यासाठी पावले उचलल्याचे सूत्रांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या मंत्रालये आणि विविध विभागांकडूनही काटकसरीच्या उपाययोजनांची तयारी सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत. पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करणे, मेट्रो रेल्वेचा वापर वाढवणे, कारपूलिंग, इलेक्ट्रिक वाहनांचा अधिक वापर, पार्सल वाहतुकीसाठी रेल्वेचा वापर आणि घरून काम करण्यास प्रोत्साहन देणे अशा विविध उपायांवर भर दिला जात आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झालेल्या मंत्रिगटाच्या बैठकीतही अनावश्यक प्रवास टाळून इंधन बचतीवर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या आठवड्याच्या सुरुवातीला सिकंदराबाद येथील सभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभक्तीचा अर्थ केवळ सीमांचे संरक्षण नसून दैनंदिन जीवनात जबाबदारीने वागणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले होते. "देशभक्ती म्हणजे केवळ सीमांवर बलिदान देणे नव्हे, तर आपल्या दैनंदिन जीवनात राष्ट्राप्रती जबाबदारी पार पाडणे होय," असे मोदी म्हणाले होते.

### अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईसाठी मंजुरी

**कोलकाता** : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सांगितले की, शाळा आणि नागरी संस्थांमधील भरतीशी संबंधित भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये आरोपी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी त्यांच्या सरकारने सीबीआयला मंजुरी दिली आहे. तसेच, प्रशासन भ्रष्टाचाराविरोधात 'शून्य-सहिष्णुता' धोरण अवलंबेल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. ममता सरकारने भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या अधिकाऱ्यांवरील कारवाई रोखून धरली होती, असेही ते म्हणाले.

# मणिपूरमध्ये चर्च शिष्टमंडळावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी** : मणिपूरमध्ये बुधवारी सकाळी चर्चच्या अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळावर झालेल्या भीषण हल्ल्यात कुकी चर्च समुदायातील तीन नेत्यांचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे राज्यात पुन्हा एकदा तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, थडू बॅप्टिस्ट असोसिएशन (टीबीए) आणि युनायटेड बॅप्टिस्ट कौन्सिलशी संबंधित हे शिष्टमंडळ चुराचंदपूरहून कांगपोकपीकडे आंतर-संघटनात्मक धार्मिक बैठकीसाठी जात असताना त्यांच्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला.

या हल्ल्यात टीबीएचे अध्यक्ष रेव्हरंड व्ही. सिटलहू, रेव्हरंड व्ही. कैगौलुन आणि पास्टर पाओगौलेन यांचा मृत्यू झाला. रेव्हरंड सिटलहू हे या पथकाचे नेतृत्व करत होते. पथकात रेव्हरंड एस. एम. हाओपू, रेव्हरंड हेकाई सिमते, रेव्हरंड पाओथांग आणि चालक गौमांग यांचाही समावेश होता. हल्ल्यात इतर चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेनंतर संतप्त झालेल्या थाडू संघटनांनी कांगपोकपी जिल्ह्यातील सदर टेकड्यांमध्ये 'संपूर्ण बंद'ची घोषणा केली आहे. या घटनेमुळे परिसरात तणाव वाढला असून सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत.

सोशल मीडियावर कुकी आणि नागा समुदायातील काही व्यक्तींचे अपहरण झाल्याच्या चर्चाही रंगल्या आहेत. मात्र अधिकृत पातळीवर या वृत्तांची अद्याप पुष्टी झालेली नाही.

### हिंदू धर्म ही एक जीवनशैली; सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण

# श्रद्धा सिद्ध करण्यासाठी मंदिरात जाण्याची गरज नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : शबरीमला मंदिर प्रवेश प्रकरणावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने हिंदू धर्माच्या स्वरूपाबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. हिंदू धर्म हा केवळ धार्मिक पद्धतींचा संच नसून एक जीवनशैली असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले. श्रद्धा सिद्ध करण्यासाठी मंदिरात जाणे किंवा विशिष्ट विधी करणे अनिवार्य नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर बुधवारी या प्रकरणाच्या सुनावणीचा पंधरावा दिवस पार पडला. शबरीमला अय्यप्पा मंदिरात महिलांच्या प्रवेशावरील बंदी आणि धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित विविध याचिकांवर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे.

सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांचे वकील डॉ. मोहन गोपाल यांनी हिंदू धर्माच्या व्याख्येबाबत प्रश्न उपस्थित केला. "१९६६ मध्ये हिंदू धर्माची व्याख्या अशी करण्यात आली की, जो वेदांना सर्वोच्च मानतो तो हिंदू. मात्र सर्व हिंदू स्वतःला त्या व्याख्येत पाहतात का? आम्हाला कधी विचारले गेले नाही," असे त्यांनी न्यायालयात सांगितले. त्यांनी म्हटले की, "माझ्या मनात वेदांविषयी आदर आहे. मात्र आज स्वतःला हिंदू म्हणवणारी प्रत्येक व्यक्ती आध्यात्मिक आणि तात्त्विक बाबींमध्ये वेदांनाच सर्वोच्च मानते, असे म्हणता येणार नाही."

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांनी महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. "म्हणूनच हिंदू धर्माला जीवनशैली म्हटले जाते. हिंदू राहण्यासाठी मंदिरात जाणे किंवा विशिष्ट धार्मिक विधी करणे आवश्यक नाही," असे त्या म्हणाल्या. श्रद्धा ही वैयक्तिक बाब असून एखाद्या व्यक्तीला कोणतेही विधी करण्याची आवश्यकता वाटणार नाही, तरी त्याच्या श्रद्धेला नाकारता येत नाही, असेही न्यायमूर्ती नागरत्ना यांनी स्पष्ट केले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनीही या मताशी सहमती दर्शवली. "एखाद्या व्यक्तीने आपल्या घरात दिवा लावला तरी त्याची श्रद्धा आणि धर्म मानण्यासाठी ते पुरेसे आहे," असे त्यांनी म्हटले.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी व्यक्त केलेल्या निरीक्षणांचाही उल्लेख करण्यात आला. प्रत्येक धार्मिक प्रथा किंवा परंपरेवर घटनात्मक न्यायालयात प्रश्न उपस्थित होऊ लागल्यास मोठ्या प्रमाणावर याचिका दाखल होतील आणि त्यामुळे धर्मव्यवस्थेच्या विघटनाचा धोका निर्माण होऊ शकतो, असे न्यायालयाने पूर्वी नमूद केले होते.

सप्टेंबर २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने शबरीमला अय्यप्पा मंदिरात १० ते ५० वयोगटातील महिलांच्या प्रवेशावरील बंदी हटवण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला होता. बहुमताने दिलेल्या त्या निकालात महिलांवरील बंदी ही घटनाबाह्य आणि बेकायदेशीर असल्याचे न्यायालयाने म्हटले होते. या निर्णयाविरोधात अनेक फेरविचार याचिका दाखल करण्यात आल्या असून त्यावर सध्या नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरू आहे.